प्रभात | पुणे | गुरुवार, दि. २६ मे २०१६

# बारावीतील 'यशवंतां'वर कौतुकाचा वर्षाव

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - यंदा बारावी निकालाची एकूणच टक्केवारी घसरली असली, तरीही महाविद्यालयांमधील जल्लोषात मात्र कोणतीही कमतरता दिसून आली नाही. महाविद्यालयांमध्ये दरवर्षीप्रमाणे बारावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक सोहळे भरविले जात आहेत; तसेच सर्वच महाविद्यालयांत जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



पर्वती : बारावीच्या निकालामध्ये शहरात यंदाही मुलींनी बाजी मारली असून, ऑनलाईन निकाल पाहिल्यानंतर जल्लोष करताना विद्यार्थिनी.

| महाविद्यालयांचे निकाल | |
|---|---|
| फर्गसन कॉलेज | ९८.७६ |
| बीएमसीसी | ९८.७३ |
| एस.पी कॉलेज | ८८.८५ |
| एमईएस गरवारे महाविद्यालय | ९८.२० |
| मॉडर्न कॉलेज (विज्ञान) | ९४.१३ |
| अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूल | ९५.९० |
| लोकसेवा ज्युनियर कॉलेज | १०० टक्के |
| अबेदा इनामदार ज्युनियर कॉलेज | ९५.४९ |

**महाविद्यालयांमध्ये निकालाचा जल्लोष**

दरवर्षीप्रमाणे फर्गसन महाविद्यालयाचा निकाल यंदाही चांगला लागला. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८.४३ टक्के, तर कला शाखेचा निकाल ९८.७६ टक्के लागला आहे. महाविद्यालयातील अंध विद्यार्थ्यांचा निकाल शंभर टक्के लागला असल्याची माहिती प्राचार्य दिलीपसिंह परदेशी यांनी दिली. मयुरी अत्रे ही अंध विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आली असून, कला शाखेत अनुश्री पाठक, तर विज्ञान शाखेतून अवनिका साने प्रथम आली आहे.

बीएमसीसी महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.७३ टक्के लागला असून, अपूर्वा करंबलेकर ६५० पैकी ६१७ गुण मिळवून प्रथम आली आहे, तर श्रेया जोशी द्वितीय आणि रिया ठाकूर तृतीय क्रमांकावर आहे.

सर परशुराम महाविद्यालयाचा एकूण निकाल ८८.८५ टक्के लागला असून, रश्मी पाठक ही विज्ञान शाखेतून ९२ टक्के गुण मिळवत प्रथम आली आहे. बेला भाटे ९१.३८ टक्के गुण मिळवत द्वितीय, तर गायत्री भोसले तृतीय क्रमांकावर आहे. कला शाखेतून जाई जोशी ८९.२३ टक्के गुण मिळवत प्रथम आली आहे, तर शिवानी भाटे व आस्था कुलकर्णी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकावर आहे. त्यांना ८८.३० व ८८.१५ टक्के गुण

(पान ३ पहा) ▸▸